महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
उपविभागीय अधिकारी कार्यालय फलटण उपविभाग फलटण ता. फलटण जि. सातारा
फोन नं- ०२१६६-(२२२३८६)
email- sdophaltan@gmail.com

फलटण दिनांक २१/१२/२०२३

.जमिन/कावि/१८९९/२०२३

त,
ॲड गणेश श्रीरंग सातारकर (नाळे)
रा.फरांदवाडी ता.फलटण जि.सातारा

विषय – फलटण शहरामध्ये श्रीमंत छत्रपती महाराणी सईबाई महाराज यांचे शासकीय स्मारकासाठी जागा/परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ – नायब तहसिलदार (महसुल) जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.मह/३/जमीन/ना/कावि/१९५१/२३ दि.०६/१०/२०२३

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, फलटण शहरामध्ये श्रीमंत छत्रपती महाराणी सईबाई महाराज यांचे शासकीय स्मारकासाठी जागा/परवानगी मिळणेबाबतचा अर्ज वरील संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे.

तरी प्रस्तुत अर्जातील जागा मागणीचे अनुषंगाने प्रकरणी कागदपत्रांचे अवलोकन केले असता, ज्या जागेमध्ये श्रीमंत छत्रपती महाराणी सईबाई महाराज यांचे शासकीय स्मारक उभारणार आहे. तीं जागा निश्चित करुन त्या जमीनीचा प्रकरणी उल्लेख केलेला दिसुन येत नाही, किंवा त्या जमीनीचा ७/१२ उतारा व इतर आवश्यक कागदपत्रे प्रकरणी सामील केलेले नाहीत. तरी आपणास ज्या जागेमध्ये स्मारक उभारायचा आहे. त्या जागेचा गट नं. किंवा सर्व्हे नंबरचा ७/१२ उतारा व इतर अनुषंगीक कागदपत्रे प्रकरणी सामील करुन मर्जीतर फेरअर्ज सादर करण्यात यावा. तसेच श्रीमंत छत्रपती महाराणी सईबाई महाराज यांचे शासकीय स्मारकासाठी परवानगी बाबत शासन निर्णय दि.०२ मे, २०१७ मधील तरतुदीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करुन पुतळा समितीची मान्यता घेण्यात यावी. सबब आपला उपरोक्त विषयांकित अर्ज निकाली ठेवणेत येत आहे.

उपविभागीय अधिकारी
फलटण उपविभाग फलटण

प्रति – मा.जिल्हाधिकारी सो, सातारा (महसुल शाखा) यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner